# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः08.03.2026** **वारःरविवार**

---

•भारत वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था असून भारतीय कंपन्यांनी फिनलंडमध्ये गुंतवणूक करावी असं फिनलंडचे अध्यक्ष अलेक्झांडर स्टब यांचं आवाहन.

•रत्नागिरी जिल्ह्यात यंदा आंबा उत्पादनामध्ये 80 टक्के घट.

•पुण्यात विद्यापीठ चौकातील बहु-प्रतीक्षित दुमजली उड्डाणपुलाचं आज लोकार्पण.

•लक्ष्य सेन, ऑल इंग्लंड बॅडमिंटन पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत पोहोचला. आणि

•टी-ट्वेंटी विश्व करंडकासाठी आज भारत-न्यूझीलंड लढत.

**<u>फिनलंड</u>**

भारत हा जगातील सर्वात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था आहे. फिनलंडला शाश्वत विकासासाठी भारताचं सहकार्य आवश्यक असल्याचं फिनलंडचे राष्ट्राध्यक्ष अलेक्झांडर स्टब यांनी काल मुंबईत दोन्ही देशातल्या उद्योजकांना संबोधित करताना सांगितलं.

अधिकाधिक भारतीय कंपन्यांनी फिनलंडमध्ये गुंतवणूक करावी असं आवाहन स्टब यांनी केलं. अमेरिकेच्या अस्थिर व्यापार धोरणामुळं जगात इतरत्र व्यापार करार होत आहेत. इतर देशात गुंतवणूक होत असल्याकडं त्यांनी लक्ष वेधलं. गेल्या काही वर्षात देशातल्या पायाभूत सुविधा, द्विपक्षीय व्यापार सुधारल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. भारतीय क्रिकेटप्रेम आणि चित्रपट याबद्दलही त्यांनी संवाद साधला.

**<u>सोलर-मसं</u>**

देशाच्या सामरिक शक्तीला नवी दिशा देण्याचं कार्य सोलर समूह करत आहे, असं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपुरमध्ये मिहान इथं सोलर डिफेन्स अँड एरोस्पेसच्यावतीनं उभारण्यात येणाऱ्या रोबोटिक्स आणि युएव्ही सुविधा प्रकल्पाच्या भूमीपूजनावेळी व्यक्त केलं. रोबोटीक इंजिन आणि ड्रोनच्या क्षेत्रात मोठी प्रगती होत असून सध्या जगभरात सुरु असलेल्या संघर्षातून त्याची प्रचिती येत आहे. सोलरचा हा प्रकल्प देखील भविष्यातील तंत्रज्ञानाशी जुळलेला असल्याचं केंद्रीय मंत्री नीतिन गडकरी यांनी यावेळी बोलताना सांगितलं. सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस लिमिटेडकडून उभारल्या जाणाऱ्या या युनिटमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित मध्यम उंचीवर आणि लांब पल्ल्याचं उड्डाण करणारे ड्रोन, रोबोट, युएव्ही आणि विविध संरक्षण उपकरणांची स्वदेशातच निर्मिती केली जाणार आहे.

**<u>हापूसआंबा</u>**

प्रदीर्घ काळ दव आणि थंडीमुळं रत्नागिरी जिल्ह्यात यंदा हापूस आंबा उत्पादनावर विपरीत परिणाम झाला असून, गेल्या वर्षीपेक्षा उत्पादनात ८० टक्के घट झाली असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शिवकुमार सदाफुले यांनी  काल जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या विशेष बैठकीत दिली. दव आणि थंडीमुळे मोहोर काळा पडला, नर मोहोराचं प्रमाण वाढलं. तसंच तुडतुडे आणि फुलकिडींचा प्रादुर्भाव झाला असं कृषी विभाग आणि दापोलीच्या डॉक्टर बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठानं सादर केलेल्या संयुक्त अहवालात म्हटलं आहे. यामागील कारणांचा तालुकानिहाय विस्तृत अहवाल राज्य शासनाकडे पाठवण्याचे आदेश पालकमंत्री उदय सामंत यांनी या बैठकीत दिले. सामंत यांनी बागायतदारांशी चर्चा करुन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

**<u>घरगुतीगॅस</u>**

घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या किंमतीत साठ रुपयांनी वाढ झाली आहे. दर वाढीनंतर आता एका सिलेंडरची किंमत दिल्लीमध्ये ९१३ रुपये, मुंबईत ९१२ रुपये ५० पैसे, कोलकत्ता इथं ९३९ रुपये आणि चेन्नईमध्ये ९२८ रुपये ५० पैसे झाली आहे. व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या किंमतीतदेखील ११५ रुपयांनी वाढ करण्यात आली आहे.

**<u>पुल</u>**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकातील बहुप्रतीक्षित एकात्मिक दुमजली उड्डाणपुलाचं आज सकाळी १० वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं होणार आहे. या उड्डाणपुलामुळं वाहतूक कोंडी कमी होण्याबरोबरच मेट्रो मार्गिका आणि उड्डाणपूल अशा एकत्रित स्वरूपामुळं वाहतुकीचा वेग वाढण्यास मदत होणार आहे.

**<u>सुनेत्रा-पवार</u>**

पुणे जिल्हा परिषद आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या वतीनं आयोजित 'मिनी सरस सावित्री जत्रा' जिल्हास्तरीय विक्री प्रदर्शनाचं उद्घाटन आणि यशवंत पंचायतराज अभियान विभागस्तरीय पुरस्कार तसंच महाआवास अभियान जिल्हास्तरीय पुरस्कार वितरण सोहळा काल उप-मुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते पार पडला.

**<u>महिला-दिन</u>**

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त राज्यात आज विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. राज्य महिला आयोगाच्यावतीनं काल महिला सन्मान पोर्टलचं अनावरण तसंच मुंबईतील आयोग कार्यालयातील सायबर वेलनेस कक्षाचं उद्घाटन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते करण्यात आलं.

केंद्रीय लोकसेवा आयोगानं अलिकडेच जाहीर केलेल्या नागरी सेवा परीक्षेच्या निकालामध्ये गडचिरोलीचे रहिवासी रजत वाळके यांनी देशभरातून ५१४ व्या क्रमांकानं ही परीक्षा उत्तीर्ण केली आहे. जिल्ह्यासाठी हे लक्षणीय यश आहे.

आपल्या ध्येयाशी एकनिष्ठ राहून शक्य असल्यास नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन ऑनलाईन अभ्यासही करावा, अशी प्रतिक्रिया रजत यांनी आपल्या यशाबद्दल बोलताना दिली...(बाईट – रजत वाळके 30 सेकंद)

अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड इथल्या निखिल तांबे यानं या परीक्षेत ५१७ वा क्रमांक मिळवून 'आयपीएस' पदाला गवसणी घालत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. आयोगातर्फे घेण्यात आलेल्या नागरी सेवा परीक्षा २०२५ चा अंतिम निकाल शुक्रवारी जाहीर करण्यात आला. या परीक्षेत देशभरातून ९५८ उमेदवार यशस्वी झाले आहेत. यात महाराष्ट्रातील ६० उमेदवारांचा समावेश आहे.

**<u>अहिल्यारत्न-</u>**

गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यातील हेमलकसा इथं आदिवासी बांधवांसाठी कार्य सुरू केल. त्याकाळी तेथील परिस्थिती अत्यंत कठीण होती.आदिवासी बांधवांचा विश्वास जिंकून परिवर्तन घडवण्यात यश आल्याच्या भावना ज्येष्ठ समाजसेविका डॉक्टर मंदाकिनी आमटे यांनी शुक्रवारी सोलापूर इथं व्यक्त केली. पुण्यश्लोक

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सातव्या नामविस्तार दिनानिमित्त डॉक्टर मंदाकिनी आमटे यांना अहिल्यारत्न’ पुरस्कार देऊन गौरविण्यात आलं. त्यावेळी त्या बोलत होत्या.

**<u>गोरे-सातारा</u>**

राज्यातील महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाला कायमस्वरुपी बाजारपेठ मिळावी यासाठी 13 जिल्ह्यांमध्ये उमेद मॉल उभारण्यात येणार आहे. सातारामधल्या पोवई नाक्यावरही उमेद मॉलची उभारणी करण्यात येणार आहे. यासाठी 20 कोटी रुपयांची तरतूद केली असून या मॉलमध्ये बचत गटांनी उत्पादीत केलेल्या मालाची विक्री होईल, असं आश्वासन ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी काल दिलं.

**<u>रंगपंचमी</u>**

रंगपंचमी उत्सवाच्या  निमित्तानं अहिल्यानगरनजीक श्री क्षेत्र मढी इथं नाथ संप्रदायातील संत कानिफनाथांच्या संजीवन समाधीचं दर्शन घेण्यासाठी लाखो भाविक मोठी गर्दी करतात. यासाठी मढी सज्ज झाली आहे. भाविकाच्या सोयीसाठी देवस्थाननं सुरक्षिततेच्या दृष्टीनं उपाययोजना केल्या आहेत. रंगपंचमी हा नाथांचा समाधी दिन असतो. 'भटक्यांची पंढरी' म्हणून ओळख असलेल्या मढीमध्ये उंच काठी घेऊन भाविक सहकुटुंब येतात. येत्या गुढीपाडव्यापर्यंत ही यात्रा चालते. यानिमित्तानं दरवर्षी इथं गाढवांचा बाजार भरतो. हिंदू मुस्लिम एकात्मतेचं प्रतिक म्हणून याची ख्याती आहे.

**<u>नाशिक</u>**

नाशिकमध्ये पेशवेकालीन पारंपरिक रहाडी उत्सवासाठी शहरातील चौकाचौकात उत्साहाचं वातावरण आहे. होळीच्या सणाच्या पाचव्या दिवशी हे रहाड नगरिकांसाठी खुले केले जातात. रासायनिक रंग न वापरता, फुलांपासून आणि नैसर्गिक साधनांपासून बनवलेले रंग वापरुन रंगपंचमी साजरी केली जाते.

**<u>लातूर</u>**

लातूर जिल्ह्यातील औसा–तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावर शुक्रवारी रात्री एका कारचालकानं रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या टेम्पोला जोराची धडक दिली. या भीषण अपघातात कारमधील सहा जणांपैकी चौघांचा मृत्यू झाला तर दोघे गंभीर जखमी झाले.

**<u>राजस्व</u>-**

सांगली जिल्ह्यातील 13 तहसील कार्यालयांमधून 69 मंडळामध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचं आयोजन करण्यात येत आहे. निवडलेल्या 13 मंडळामध्ये काल या शिबिरा पहिला टप्पा राबविण्यात आला. पालकमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते पालघर तालुक्यातल्या माहिममध्ये हे अभियान सुरु करण्यात आलं. यवतमाळमध्ये या अभियानाची सुरुवात पालकमंत्री संजय राठोड यांच्या उपस्थितीत झाली या अभियानामध्ये महसूल विषयक प्रलंबित फेरफार प्रकरणे, 7/12 उताऱ्यातील दुरुस्ती  योजनेची कामं करण्यात येतात

**<u>बॅडमिंटन</u>**

ऑल इंग्लंड खुल्या बॅडमिंटन चॅम्पियनशिपमध्ये, लक्ष्य सेननं पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. जागतिक क्रमवारीत १२ व्या स्थानावर असलेल्या लक्ष्यनं काल बर्मिंगहॅम इथं झालेल्या उपांत्य सामन्यात कॅनडाच्या व्हिक्टर लाईचा २१-१६, १८-२१, २१-१५ असा पराभव केला. आज होणाऱ्या अंतिम फेरीत लक्ष्यचा सामना चायनीज तैपेईच्या लिन च्युन यु याच्याशी होईल.

**<u>क्रिकेट</u>**

आयसीसी पुरुष टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषकासाठी, गतविजेत्या भारताचा सामना आज अहमदाबाद इथं न्यूझीलंडशी होणार आहे. हा सामना संध्याकाळी ७ वाजता सुरू होईल. टी-ट्वेंटी विश्वचषकाच्या अंतिम फेरीत भारतीय संघ चौथ्यावेळी पोहोचला आहे. तर न्यूझीलंडसाठी हा दुसरा अंतिम फेरीतला सामना असेल. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघानं मुंबईत झालेल्या रोमांचक उपांत्य फेरीत इंग्लंडला सात धावांनी हरवून अंतिम फेरीत प्रवेश केला, तर मिशेल सॅंटनरच्या नेतृत्वाखालील न्यूझीलंडनं कोलकाता इथं दक्षिण आफ्रिकेचा नऊ गडी राखून पराभव केला.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.